# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सन-2017-18

लाभार्थींचे नाव : श्री.जोसेफ नवश्या गांगोडा

पत्ता : मु.वसा –, ता.तलासरी जि.पालघर

योजनेचे नाव :- प्रधानमंत्री आवास योजन-ग्रामीण

लाभाचे नाव :- घरकुल

तांत्रिक मान्यता : 30/03/2018

प्रशासकीय मान्यता : 11/07/2017

कामाचा संकेतांक : MH-02-005-018-001/AJAY621

काम चालू झाल्याचा दिनांक : 15/05/2018

काम पूर्ण झाल्याची दिनांक : 08/10/2018

अंदाजपत्रकीय रक्कम : 1,20,000/-

श्री.जोसेफ नवश्या गांगोडा यांचे अगोदरचे कच्चे कुडाचे घर



श्री.जोसेफ नवश्या गांगोडा यांचे लाभ दिल्यानंतरचे पक्के घर



## लाभार्थींचे मनोगत :

मी, श्री. जासेफ नवश्या गांगोडा, रा.मु. वसा, ब्राम्हणपाडा, पो.झरी, ता.तलासरी जि.पालघर येथील रहिवासी असून मला आदिम जमाती आवास योजने अंतर्गत सन 2017-2018 मध्ये घरकुल मंजूर झाले. या पूर्वी माझे कुटुंब खूपच हालाखीचे जिवन जगत होते. त्याच प्रमाणे माझे कुटुंब कच्च्या कुडाच्या घरात राहत होते. आमच्या कडे घरबांधण्याइतकी परिस्थिती नसल्यामुळे पावसाळयात पावसाचा व हिवाळयात थंडीत कुडाच्या कच्या घरात शारीरिक त्रास सहन करावा लागायचा. परंतु मला आदिम जमाती आवास योजनेतुन पंचायत समिती तर्फे घरकुलाचा लाभ मिळाल्याने मला माझ्या आयुष्यात कलाटणी देणारे ठरले. सुरूवातीला कुटुंबात जास्त व्यक्ती असल्यामुळे घर थोडे मोठे बांधावयाचे होते. परंतु घरकुलासाठी लागणारे साहित्य महाग असल्यामुळे आम्ही गावातील 15 सदस्यांनी कनसरी पुरूष बचत गट या नावने स्थापन केला व 15 पैकी 8 कुटुंबांना घरकुल मंजुर झाल्याने आम्ही बचत गटामार्फत आदिवासी विकास विभागातुन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प –डहाणु येथे विट भटटीचा प्रस्ताव सादर करून आम्हाला ऑक्टोंबर 2017 रक्कम रूपये 3.00 लक्ष न्युक्लिअस बजेटमधुन विट भटटीचा व्यवसाय सुरू करण्याची अर्थसहायय दिले व आम्ही सदरचा व्यवसाय सुरू करावयाचा निर्णय घेतला. त्या विट भटटीपासुन आम्ही 4 विट भटटया सुरू केल्या. अंदाजे 1.20 लक्ष विटा आम्ही बनविल्या. त्यापैकी 2 विट भटटया च्या विटा व्यवसाय करून विकल्या व 2 विट भटटयाच्या 40,000 विटा आम्ही 8 कुटुंबांनी आमच्या स्वत:च्या घरकुलासाठी प्रत्येक 5000 प्रमाणे वापरल्या व घरकुल पुर्ण केले. या सर्व लाभामुळे व बचत गटाच्या सहाययाने मी माझ्या कुटुंबाला चांगल्या पक्क्या घरात राहण्यास सुरूवात केली आहे. या कामाबाबत पंचायत समिती तलासरी व ग्रामपंचायत वसा चे ग्रामविकास अधिकारी यांचे उत्तम मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प- डहाणु यांनी आम्हाला विटभटटी करीता अनुदान दिले असून घरकुल बांधण्यात मला आर्थिक बोजा कमी झाला. ज्यांनी आम्हाला चांगले सहयोग दिले त्याचे मी धन्यवाद मानतो. आज मला घरकुलाचा लाभामुळे कच्या घराचे पक्कया घरात रूपांतर होवून मी माझ्या कुटुंबासहीत व्यवस्थित राहत असल्यामुळे फायदा झालेला आहे. मी व माझे कुटूंब समाधानी आहे.

## प्रशासकीय सहयोग:

शासनाच्या आदिम जमाती आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी कातकरी समाजाच्या कच्चे घर असलेल्या कुटुंबांना सद योजनेचा लाभ दयावयाचा असल्याने सदर कुटुंब हे पात्र असल्याने ग्रामपंचायती मार्फत ग्रामसभेतुन ठरावा घेवुन पात्र ठरविलेल्या हया लाभार्थीचे क्षेत्रिय पाहणी करून त्यास या योजनेचा लाभ देण्यांत आला आहे.तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प- डहाणु यांनी न्युक्लिअस बजेट मधुन कनसरी पुरूष बचतगटास रक्कम रू.3.00 लक्ष अर्थसहायय देवून या बचत गटांनी सादर केलेला विट भटटीचा प्रस्ताव मंजुर करून ऑक्टोंबर 2017 मंजुर केला व सदर बचत गटाने विट भटटीचा व्यवसाय सुरू केला. सदर लाभार्थीस या सर्व कार्यालयाकडुन योग्य मार्गदर्शन व सहाकार्य केल्यामुळे सदर लाभार्थीचे कुटुंब आज कच्या घरातुन पक्या घरात आनंदाने वास्तव्य करीत असून शासनाच्या योजनेची फलश्रृती केलेली दिसत आहे. त्यामुळे सदर कुटुंब समाधानी असल्याचे मनोगत व्यक्त केले आहे.